नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५२ Issue - 252 | वार रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ Blow- Sunday Date 1 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सुनेत्रा पवार यांनी घेतली राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

## राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री; समर्थकांकडून 'अजित दादा अमर रहे'च्या घोषणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. त्या राज्याच्या पहिल्या म हिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. संध्याकाळी पाच वाजता लोकभवनात त्यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, दत्तात्रय भरणे, अदिती तटकरे या सोहळ्याला उपस्थित होते.

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच तिथे उपस्थित असलेल्या दादा समर्थकांनी अजित दादा अमर रहेच्या घो-षणा दिल्या. त्यामुळे लोकभवनाच्या हॉलमधील वातावरण काहीसं भावुक झालं. सुनेत्रा पवारदेखील भावुक झालेल्या दिसल्या. सुनेत्रा पवार यांनी आजच त्यांच्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे. २०२४ पासून त्या राज्यसभेच्या खासदार होत्या. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यापूर्वी त्यांनी खासदारकी सोडली.

सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आ-हेत. २८ जानेवारीच्या सकाळी पा-वणे नऊच्या सुमारास अजित पवार यांचा बारामतीत विमान अपघातात मृत्यू झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवार यांच्या अस्थी काल नीरा नदीत विसर्जित करण्यात आल्या. यानंतर रात्रीच्या सुमारास सुनेत्रा पवार त्यांचे पुत्र जय यांच्या सोबत मुंबईच्या दिशेनं रवाना झाल्या.

आज दुपारी दोनच्या सुमारास राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांची बैठक झाली. या बैठकीत मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. सुनेत्रा पवार यांना विधिमंडळ गटनेत्या करण्याचा प्रस्ताव एकमतानं मंजूर झाला. या प्रस्तावाला मंत्री छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिलं. विधिमंडळ पक्षाचे सर्व घटनात्मक अधिकार आमदारांनी एकमुखानं सुनेत्रा पवार यांच्याकडे दिले. यानंतर आज संध्याकाळी सु-नेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

शपथविधी सोहळ्यानंतर सुनेत्रा पवार बारामतीला रवाना होणार आ-हेत. पुढील १० दिवस त्या बारामतीत असणार आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी त्या मुंबईला आल्या होत्या. पुढील १० दिवस त्यांचा म ुक्काम बारामतीतच असेल.

# सुनेत्रा पवारांच्या शपथविधीनंतर पंतप्रधान मोदींकडून शुभेच्छा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आज एका नव्या अध्यायाची सुरुवात झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. राजभवन येथे त्यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. यावेळी महायुतीतील भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) गटाचे प्रमुख नेते उपस्थित होते.

शपथविधी सोहळ्यानंतर लगेचच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाद्वारे सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्याबद्दल सुनेत्रा पवारजी यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्या जनहितार्थ अथक परिश्रम करतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे 'व्हिजन' यशस्वीपणे पुढे नेतील, असा मला ठाम विश्वास आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी सुनेत्रा पवारांना शुभेच्छा दिल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीत म हायुतीने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयानंतर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली होती. अर्थ आणि क्रीडा यांसारखी महत्त्वाची खातीदेखील त्यांच्याकडे होती. मात्र, २८ जानेवारी रोजी बारामतीकडे जाताना झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात त्यांचे निधन झाले. या धक्कादायक घटनेनंतर अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाने सुनेत्रा पवार यांची गटनेता म्हणून एकमताने निवड केली. या नियुक्तीनंतर त्यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

दरम्यान, एकीकडे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून या शपथविधीला सर्वजण उपस्थित असताना, दुसरीकडे मात्र शरद पवार गटाने या सोहळ्याकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले आहे. शरद पवार यांनी आपल्याला या शपथविधीबद्दल माहिती नसल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, सुनेत्रा पवार यांच्या नणंद खासदार सुप्रिया सुळे या शपथविधीवेळी बारामतीत होत्या.

प्रसारमाध्यमांशी बोलताना सुळे म्हणाल्या, मी येथे केवळ माझ्या काकींची (अजितदादांच्या आई) भेट घेण्यासाठी आले आहे. उद्यापासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असल्याने मला दिल्लीला रवाना व्हायचे आहे.

शपथविधीशी संबंधित कोणत्याही राजकीय प्रश्नावर त्यांनी भाष्य करणे टाळले, ज्यामुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत संघर्षाची चर्चा पुन्हा एकदा सुरु झाली आहे.

# इशान किशनच्या शतकाच्या जोरावर भारताचा दणदणीत विजय, न्यूझीलंडला धुळ चारत मालिका ४-१ ने जिंकली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तिनुवनंतरपुरम : इशान किशनच्या धडाकेबाज शतकाच्या जोरावर भारताने न्यूझीलंडवर पाचव्या टी २० सामन्यात दणद-णीत विजय साकारला. अभिषेक शर्मा या सामन्यात जास्त धावा करू शकला नाही, पण त्याची कसर इशान किशनने यावेळी भरून काढली. इशाने किशनने धमाकेदार शतक झळाकवले आणि त्याच्या शतकाच्या जोरा-वर भारताने २७१ धावांचा डोंगर उभारला होता. या आव्हानाच पाठलाग करताना न्यूझीलंडने ८ षटकांतच सतक पूर्ण केले होते. पण त्यानंतर ठराविक फरकाने न्यूझीलंडचे फलंदाज बाद होत गेले आणि भार-ताला ४६ धावांनी दिमाखदार विजय साकारता आला.

भारताने टॉस जिंकला आणि सूर्यकुमार यादवने प्रथमच या मालिकेत प्रथम फलंदाजी स्विकारण्याचा निर्णय घेतला. पण भारताची या सामन्यात सुरुवात चांगली झाली नाही. कारण संजू सॅमसन यावेळी फक्त सहा धावांवर बाद झाला. त्यावेळी अभिषेक शर्मा हा धडाकेबाज फटकेबाजी करत होता. पण अभिषेक शर्माही ३० धावांवर बाद झाला आणि भारताला दुसरा धक्का बसला. पण भारताला यावेळी सारवले ते इशान किशनने. इशान किशनने यावेळी फक्त २८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर इशान किशनने शतकाच्या दिशेने कूच केली. इशान किशन नव्वदीत दाखल झाला. इशान ९७ धावांवर होता आणि त्याला शतकासाठी फक्त तीन धावांची गरज होती. त्यावेळी इशान किशनने षटकार लगावला आणि आ-पले पहिले वहिले शतक साजरे केले. कर्णधार सूर्यकुमार यादवनेही यावेळी ३० चेंडूंत ६३ धावांची खेळी साकारत इशानला चांगली साथ दिली. हार्दिक पंड्यानेही यावेळी ४२ धावांची आक्रमक खेळी साकारली. त्यामुळे भारताला या सामन्यात २७१ धावांचा डोंगर उभारता आला.

भारताच्या २७२ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची पहिली विकेट लगेच पडली. पण त्यानंतर फिन एलेनने ८० धावांची खेळी साकारत संघाला विजयाची आशा दाखवली होती. पण अक्षर पटेलने त्याला बाद केले आणि त्यानंतर न्यूझीलंडचा डाव गडगडला. त्यामुळे भारताला या सामन्यात न्यूझीलंडवर मोठा विजय साकारता आला. या विजयासह भार-ताने ही मालिका ४-१ अशी जिंकली आहे.

भारताने या मालिकेची सुरुवात चांगली केली होती. त्यानंतर भारताला एक सामना गमवावा लागला होता. पण अखेर भारताच्या विजयाची गाडी या सामन्यात रुळावर आली.

### सरकार म्हणून आम्ही कुटुंबियांच्या पाठिशी : मुख्यमंत्री

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार अजितदादांचा वारसा समर्थपणे चालवतील : फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजितदादांचा वारसा त्या समर्थपणे चालव-तील, हा मला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

सुनेत्रा पवार यांनी आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रसंग कठीण होता पण, ज्या धीरोदात्तपणे श्रीमती सुनेत्रावहिनींनी महाराष्ट्र हिताचा निर्णय घेतला, तो कौतुकास्पद, धाडसी आणि त्यांची प्रतिबद्धता अध-ोरेखित करणारा आहे. शुभेच्छा देण्याचा हा प्रसंग नाही. पण, अजितदादांचा वारसा त्या समर्थपणे चालवतील, हा मला विश्वास आहे. राज्याला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री लाभल्या, त्यांची ही कारकिर्द यशस्वी ठरेल. भाजपा आणि महायुती सरकार म्हणून या कठीण प्रसंगी, आम्ही अजितदादा पवार यांच्या कुटुंबीयांच्या पाठिशी आहोत असे मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गटनेते पदासाठी सुनेत्रा पवार यांच्या ना-वाचा प्रस्ताव पक्षाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी मांडलाय. तर या प्रस्तावाला पक्षाचे जेष्ठ नेते म्हणून मंत्री छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिलंय. परिणामी, सु-नेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड झाली आहे. त्यानंतर आज सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे अजित पवारांच्यानंतर इथून पुढे सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर पक्षाची धुरा असणार आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्रिपदानंतर सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष करण्यासाठी सह्या घेण्याची प्रकिया सुरु झाल्याची माहिती मिळत आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी आज शपथ घेतली आहे. सुनेत्रा पवार शपथ घेत असताना कार्यकर्त्यांनी अजित पवार अमर रहे अमर रहे च्या घोषणा दिल्या. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधी सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सु-नील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहिले.

# आज केंद्राचा अर्थसंकल्प सादर होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी रोजी त्यांचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत आणि देशा-तील कोट्यवधी करदात्यांचे लक्ष अर्थमंत्र्यांच्या आयकरविषयक घोषणांवर लागून असेल. गेल्या वर्षी १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्याच्या निर्णयानंतर आगामी २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात नवीन कर प्रणाली अंतर्गत आणखी सवलती मिळण्याची अपेक्षा वाढली आहे, ज्यात उच्च प्रमाणित वजावट आणि गृहकर्जावरील व्याज व वैद्यकीय विमा हप्त्यांसाठी वजावटींचा समावेश आहे. २०२६ च्या अर्थसंकल्पात देशभरातील नोकरदार व्यक्तींना मोठी सवलत मिळण्याची, विशेषतः पगारदार करदात्यांना आयकर आणि पगार कपातींवर आणखी सवलत मिळण्याची अपेक्षा आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पातून मानक वजावट वाढवणे ही पगारदार वर्गाची सर्वात मोठी मागणी आहे. सध्या नवीन कर प्रणालीमध्ये मानक कपात ७५००० रुपये असून २०२६ च्या अर्थसंकल्पात ही वजावट १ लाखांपर्यंत वाढवली जाईल अशी अपेक्षा आहे. असे झाल्यास नव्या कर प्रणालीत वार्षिक १३ लाखांपर्यंतचे पगार करमुक्त होऊ शकते आणि नोकरदारांना दिलासा मिळू शकतो.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ जवळ येत असताना सरकार अखेरीस जुनी आयकर प्रणाली बंद करून नवीन कर प्रणालीलाच वैयक्तिक करदात्यांसाठी एकमेव प्रणाली बनवणार का, याबद्दल अटकळ तीव्र झाली आहे. आतापर्यंत कोणताही अधिकृत संकेत मि ळाले नसले तरी, अहवालानुसार सरकार जुनी आयकर प्रणाली टप्प्याटप्प्याने बंद करण्याची शक्यता आहे.

अर्थसंकल्प २०२६ च्या अपेक्षांवर टाइम्स ऑफ इंडियाने केलेल्या अलीकडील सर्वेक्षणानुसार, बहुतेक कर तज्ञांनी सरकार अखेरीस जुनी आयकर प्रणाली बंद करण्याचा विचार करू शकते, तथापि हा बदल टप्प्याटप्प्याने होण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तवला.

अर्थसंकल्पाची वेळ जसजशी जवळ येत आहे तसतसे शेअर बाजाराची धाकधूकही वाढली आहे. सरकार पुन्हा एकदा भांडवली नफा कर रच-नेत सुधारणा करू शकते, विशेषतः अशा वेळी जेव्हा शेअर बाजार आधीच कमकुवत स्थितीत असल्याची शक्यता आहे. कर वाढीबाबत अद्याप कोणतेही अधिकृत प्रस्ताव आलेले नसले तरी, सध्याचे बाजारातील वातावरणामुळे गुंतवणूकदारांना चिंताग्रस्त झाले आहेत.

२०२४ च्या अर्थसंकल्पात सरकारने दीर्घकालीन भांडवली नफा कर १२.५% पर्यंत वाढवला, नवीन गुंतवणुकीवरील इंडेक्सेशन लाभ काढून टाकला आणि अल्पकालीन भांडवली नफा कर २०% पर्यंत वाढवला.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६



# भारतासमोरील आव्हान : धोरण आणि प्रक्रिया सुधारणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

केंद्रीय अर्थ व कॉर्पोरेट व्यवहार मंत्री सौ. निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षण २०२५–२६ च्या प्रस्तावनेत असे मांडले आहे की, राज्याने ''अनिश्चिततेच्या परिस्थितीत उद्योग विषयक धोरणनिर्मितीत अधिक सखोल वळण घेणे आवश्यक आहे जे निश्चितता येण्याआधी कृती करू शकते, जोखीम टाळण्याऐवजी तिचे व्यवस्थापन करते, प्रयोगांतून पद्धतशीरपणे शिकते आणि ठप्प न होता मार्ग दुरुस्त करते.''

या प्रस्तावनेत असेही स्पष्ट करण्यात आले आहे की ही केवळ ''सैद्धांतिक आकांक्षा'' नाही. उलट, ''या दृष्टिकोनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी भारतात आधीच दिसू लागली आहे अर्धसंवाहक (सेमिकंडक्टर) व हरित हायड्रोजनसाठी मिशन–मोड व्यासपीठांची निर्मिती, पहिल्यांदाच होणाऱ्या देशांतर्गत नवोन्मेषांना सक्षम करणारी सार्वजनिक खरेदी प्रणालीची पुनर्रचना, तसेच तपासणीवर आधारित नियंत्रणाऐवजी विश्वासाधारित अनुपालनावर आधारित राज्यस्तरीय उदारीकरण करार ही त्यांची उदाहरणे आहेत. अनुपालनातून क्षमतेकडे वाटचाल करणारे उद्योजक राष्ट्र राज्य कसे असते याची ही सुरुवातीची चिन्हे आहेत.''

आर्थिक सर्वेक्षणात कोविडनंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला सामोरे जाव्या सलग आव्हानांची नोंद घेण्यात आली असून, आणि असे असतानाही भारताने विशेषत: मजबूत व्यापक आर्थिक कामगिरीमुळे लवचिकता दाखवली आहे, असे नमूद करण्यात आले आहे. एप्रिल २०२५ मध्ये अमेरिकेने लादलेल्या आयात शुल्कांच्या पार्श्वभूमीवर सरकारने राबवलेल्या धोरणात्मक व आर्थिक सुधारणांचीही दखल घेण्यात आली आहे. सुधारणांची तातडी लक्षात घेता, ''सरकारमध्ये गतिशीलतेची भावना निर्माण झाली आहे. अवघ्या पाच महिन्यांत भारत आता ७ टक्क्यांहून अधिक वास्तविक वार्षिक वाढीचा अंदाज बांधत आहे, आणि पुढील वर्षातही सुमारे ७ टक्के वाढ अपेक्षित आहे,'' असे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

आर्थिक सर्वेक्षणानुसार २०२५ वर्षातील विरोधाभास असे आहेत की, भारताची गेल्या काही दशकांतील सर्वात मजबूत व्यापक आर्थिक कामगिरी अशा जागतिक व्यवस्थेशी भिडली आहे जी आता चलन स्थैर्य, भांडवली प्रवाह किंवा धोरणात्मक संरक्षणाच्या रूपाने त्या यशाला पूर्वीप्रमाणे बक्षीस देत नाही.

जागतिक परिस्थिती आणि देशांतर्गत आकांक्षांच्या संदर्भात आर्थिक सर्वेक्षणात म्हटले आहे:

''१४५ कोटी लोकसंख्या असलेला भारत लोकशाही चौकटीत एका पिढीत समृद्ध राष्ट्र बनण्याची आकांक्षा बाळगतो. भारताचा आकार आणि लोकशाही कोणत्याही अनुकरणीय साच्याची शक्यता आपोआपच नाकारतात. जागतिक प्रभुत्वशाली शक्ती आपली आर्थिक व इतर प्राधान्ये पुनर्विचारात घेत असताना, जागतिक व्यापारात अनिश्चितता वाढत आहे आणि जागतिक तणाव व भेद रेषा रुंदावत आहेत, अशा परिस्थितीत भारताच्या आर्थिक आकांक्षांवर तीव्र जागतिक प्रतिकूल वारे वाहत आहेत. परंतु आपले राष्ट्र राज्य, आपले खासगी क्षेत्र आणि कुटुंबे एकत्र येऊन परस्परांशी जुळवून घेण्यास आणि आवश्यक त्या प्रयत्नांच्या प्रमाणात बांधील राहण्यास तयार असतील, तर ह्याच प्रतिकूल शक्ती अनुकूल वाऱ्यांमध्ये रूपांतरित होऊ शकतात. हे कार्य सोपे किंवा आरामदायक



नसेल पण ते अपरिहार्य आहे.''

वास्तववादी दृष्टीकोनातून आर्थिक सर्वेक्षणाने २०२६ साठी तीन प्रकारची संभाव्य जागतिक परिस्थिती मांडली आहे: सुरू असलेल्या जागतिक राजकीय व आर्थिक अस्थिरतेचे नकारात्मक परिणाम उशिरा देखील प्रकट होण्याची भीती कायम आहे. या घडामोडी अशा जगाकडे निर्देश करतात जे कमी समन्वित, अधिक जोखमीपासून सावध आणि कमी सुरक्षिततेच्या मर्यादेसह अधिक अनिश्चित परिणामांना सामोरे जाणारे आहे. ही परिस्थिती सातत्यापेक्षा नियंत्रित अव्यवस्थेबद्दल अधिक आहे, जिथे देश एकत्रित जागतिक व्यवस्थेत कार्यरत असले तरी परस्पर अविश्वास वाढत आहे.

विस्कळीत बहुध्रुवीय विघटनाची शक्यता लक्षणीयरीत्या वाढत असून ती केवळ किरकोळ धोका म्हणून पाहता येणार नाही. या परिस्थितीत धोरणात्मक स्पर्धा तीव्र होईल, व्यापार अधिकाधिक दडपशाही स्वरूपाचा बनेल, निर्बंध व प्रत्युत्तरात्मक उपाय वाढतील, पुरवठा साखळ्या राजकीय दबावाखाली पुनर्रचित केल्या जातील आणि आर्थिक तणाव सीमा ओलांडून अधिक वेगाने पसरतील. अशा जगात धोरणे अधिक राष्ट्रकेंद्रित होतील आणि देशांना स्वायत्तता, वाढ व स्थैर्य यांच्यात कठोर तडजोडी कराव्या लागतील.

आर्थिक, तांत्रिक आणि भू राजकीय ताणतणाव परस्पर वाढवत जाणाऱ्या प्रणालीगत धक्क्यांच्या साखळीचा धोका. जरी ही शक्यता तुलनेने कमी असली तरी तिचे परिणाम अत्यंत असमतोल असतील. व्यापक आर्थिक परिणाम २००८ च्या जागतिक आर्थिक संकटापेक्षाही अधिक गंभीर ठरू शकतात.

या तिन्ही परिस्थितींमध्ये, आर्थिक सर्वेक्षणानुसार भारत इतर अनेक देशांच्या तुलनेत चांगल्या स्थितीत आहे, कारण त्याची व्यापक आर्थिक मूलतत्त्वे मजबूत आहेत; मात्र यामुळे पूर्ण संरक्षण हमी मिळत नाही. मोठी देशांतर्गत बाजारपेठ, कमी वित्तीयकरणावर आधारित वाढीचा नमुना, मजबूत परकीय चलन साठा आणि विश्वासार्ह धोरणात्मक स्वायत्तता ही भारताची बळकट बाजु आहे. आर्थिक अस्थिरता व भूराजकीय अनिश्चितता असलेल्या वातावरणात ही वैशिष्ट्ये संरक्षक कवचाचे काम करतात.

आर्थिक सर्वेक्षणात पुढे म्हटले आहे की,

''या तिन्ही परिस्थिती भारतासाठी एक समान धोका निर्माण करतात भांडवली प्रवाहात अडथळा आणि त्यामुळे रुपयावर होणारा परिणाम. फरक केवळ त्याच्या तीव्रतेत व कालावधीत असेल. भूराजकीय अस्थिरतेच्या जगात हा परिणाम एका वर्षापुरता मर्यादित न राहता दीर्घकालीन ठरू शकतो.''

एकाच वेळी मॅरेथॉन आणि स्प्रिंट

याला प्रतिसाद म्हणून आर्थिक सर्वेक्षणाने नमूद केले आहे की भारताने गुंतवणूकदारांचा विश्वास आणि परकीय चलनातील निर्यात उत्पन्न इतके वाढवले पाहिजे की वाढत्या आयातीचा खर्च तो पेलू शकेल. स्वदेशीकरणाच्या यशानंतरही उत्पन्न वाढल्यास आयात वाढणारच आहे.

आर्थिक धोरणाने पुरवठ्याची स्थिरता, संसाधन साठे आणि मार्ग व पेमेंट प्रणालींचे विविधीकरण यांवर लक्ष केंद्रित करावे, असे सर्वेक्षण सुचवते. २०२६ साठी योग्य धोरण म्हणजे संरक्षणात्मक निराशावाद नव्हे, तर रणनीतिक संयम असल्याचे त्यात नमूद आहे. बाह्य वातावरणामुळे भारताला देशांतर्गत वाढ आणि धक्के शोषण्याची क्षमता या दोन्हीला प्राधान्य द्यावे लागेल, ज्यामध्ये साठे, अतिरिक्त व्यवस्था आणि तरलता यांवर अधिक भर द्यावा लागेल.

म्हणजेच, आर्थिक सर्वेक्षण स्पष्टपणे सांगते की,

''भारताने एकाच वेळी मॅरेथॉन आणि स्प्रिंट धावली पाहिजे किंवा मॅरेथॉन स्प्रिंटप्रमाणे धावली पाहिजे.''

भारतासमोरील आव्हान : धोरण आणि प्रक्रिया सुधारणा

एकामागोमाग येणाऱ्या धक्क्यांनी आणि भू राजकीय तणावाने भारलेल्या जगात, भारतासमोरील खरे आव्हान केवळ उत्तम धोरणे आखणे इतकेच नाही, तर नियम, प्रोत्साहने आणि प्रशासकीय यंत्रणा राष्ट्रीय लवचिकतेस पूरक ठरतील याची खात्री करणे हेही आहे, असे आर्थिक सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे. धोरण सुधारणा महत्त्वाच्या आहेतच, पण प्रक्रिया सुधारणा त्याहून अधिक निर्णायक ठरतात. कारण प्रक्रिया सरकार आणि नागरिकांमधील परस्पर संबंध ठरवतात. त्यामुळेच धोरणांचा उद्देश आणि सुधारणा यशस्वी होतात की अपयशी ठरतात, हे ठरते. या बाबतीत चिन्हे अत्यंत आशादायक आहेत. विशेषत: गेल्या वर्षात राबवलेल्या डि–रेग्युलेशन आणि स्मार्ट रेग्युलेशन उपक्रमांमुळे राष्ट्र राज्ययंत्रणा स्वत:ला आणि आपल्या ध्येयाला नव्याने घडवू शकतेनियंत्रण व आदेश देण्याच्या भूमिकेतून सुलभता व सक्षम बनविण्याच्या भूमिकेकडे वळू शकतेयाचा ठोस आधार मिळतो.

केंद्रीय सरकारच्या आर्थिक सुधारणांबरोबरच इतर धोरणात्मक उपक्रम मिळून लक्षात घेतले तर ते दर्शवतात की राष्ट्र राज्याला या आव्हानाचे गांभीर्य समजले आहे आणि त्याला सामोरे जाण्याची गरजही ते ओळखते, असे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

आर्थिक सर्वेक्षणात राष्ट्र राज्याची क्षमता, समाज आणि डि–रेग्युलेशन हे तीन घटक 'विकसित भारत' आणि जागतिक प्रभाव साध्य करण्यासाठी एकत्र आणले आहेत. लोकशाही व्यवस्थेत विकास घडवून आणण्याची जबाबदारी आणि अधिकार राष्ट्र राज्याकडेच असतो. मात्र ते प्रभावीपणे पार पाडण्यासाठी राष्ट्र राज्याने स्वत:चे कौशल्य अद्ययावत करणे, पुन:कौशल्य प्राप्त करणे आणि वेगळा खेळ खेळण्याची मानसिक तयारी ठेवणे आवश्यक आहे, कारण परिस्थिती बदलली आहे, कधी कधी शत्रुत्वाचीही आहे, जुने नियम लागू राहत नाहीत आणि नवे नियम अजून स्थिर झालेले नाहीत.

जागतिक स्तरावर अनेक संकटे एकाच वेळी उद्भवण्याची शक्यता असून, त्यामुळे निर्माण होणाऱ्या नव्या जागतिक व्यवस्थेला आकार देण्यात भारताला महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळू शकते. यासाठी भारताला स्वातंत्र्यानंतर आजवर कधीही लागली नसेल इतकी चपळ, लवचिक आणि उद्देशपूर्ण प्रशासन व्यवस्था उभी करावी लागेल, असे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

म्हणजेच, सर्वेक्षणानुसार, आपण सर्वांनी तात्काळचे लाभ टाळून दीर्घकालीन फायद्यांना प्राधान्य दिल्यास देशाला मोठा लाभ होऊ शकतो. भू राजकीय पुनर्रचनांमुळे जागतिक वातावरण बदलत असून, त्याचा गुंतवणूक, पुरवठा साखळ्या आणि वाढीच्या शक्यतांवर दीर्घकाळ परिणाम होणार आहे. या जागतिक उलथापालथींच्या पार्श्वभूमीवर भारताने तात्पुरत्या उपायांऐवजी लवचिकता निर्माण करणे, सातत्याने नवोन्मेष करणे आणि 'विकसित भारत'च्या दिशेने ठामपणे वाटचाल करणे निवडले पाहिजे.

या वर्षीचे आर्थिक सर्वेक्षण पारंपरिक स्वरूपापासून वेगळे आहे. या आवृत्तीमध्ये विषयांची सखोलता आणि व्याप्ती दोन्ही वाढवण्यात आल्या आहेत. एकूण १७ प्रकरणे असून ती नव्याने मांडली आहेत. पूर्वी प्रकरणांची मांडणी परंपरेवर आधारित होती; आता ती राष्ट्रीय प्राधान्यांच्या सखोलतेवर आणि काळसुसंगततेवर आधारित आहे. समाविष्ट विषयांची व्याप्ती मोठी असल्याने हे सर्वेक्षण यावेळी अधिक विस्तृत आहे. याशिवाय, मध्यम ते दीर्घकालीन महत्त्वाच्या तीन विषयांवर विशेष निबंधांचा समावेश आहे कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास, भारतीय शहरांमधील जीवनमानाचे आव्हान, आणि धोरणात्मक लवचिकता व जागतिक महत्त्व साध्य करण्यात राष्ट्र राज्याची क्षमता व खासगी क्षेत्राची (देशांतर्गत घटकांसह) भूमिका.

# उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच सुनेत्रा पवारांकडील खाती जाहीर; 'ती' शक्यता खरी ठरली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांच्याकडील खाती जाहीर करण्यात आली आहेत. अजित पवार यांच्याकडे असलेली खाती सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आलेली आहेत. याला केवळ अर्थ खात्याचा अपवाद आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थ मंत्रालयाचा प्रभार स्वत:कडे ठेवला आहे. राज्याचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर केला जाणार आहे. तोपर्यंत अर्थ खात्याची जबाबदारी फडणवीस यांच्याचकडे राहण्याची शक्यता आहे.

राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास ही खाती सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. सुनेत्रा पवार यांच्याकडे ३ खात्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. अर्थ मंत्रालय मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवलं आहे. महिन्याभरात अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. त्यावर सध्या काम सुरु आहे. सुनेत्रा पवार यांना प्रशासनाचा गाडा हाकण्याचा फारसा अनुभव नाही. त्या पहिल्यांदाच सरकारमध्ये काम करणार आहेत. त्यातच अर्थसंकल्प तयार करण्यासाठी अवघ्या महिन्याभराचा कालावधी शिल्लक आहे. या सगळ्या गोष्टी लक्षात घेता सुनेत्रा पवार यांच्याकडे अर्थ मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आलेली नाही.


राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांनी काल मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. अजित पवार यांच्याकडील अर्थ आणि नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक विकास, क्रीडा आणि युवक कल्याण ही खाती पक्षाकडे कायम राहावीत, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी फडणवीस यांच्याकडे केली होती.

सध्याच्या घडीला अर्थ खातं मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्याकडे ठेवलं आहे. मार्च महिन्यात सादर होणारा अर्थसंकल्प फडणवीसच मांडतील, अशी शक्यता आहे. काल त्यांनी यावर भाष्य केलं. अजित पवारांनी अर्थ मंत्री म्हणून अर्थसंकल्पावर काम सुरु केलं होतं. त्यांनी अर्थसंकल्पासाठी बरीच तयारीदेखील केली होती. त्यात मी उद्यापासून लक्ष घालेन, असं फडणवीस म्हणाले होते. त्यामुळे आगामी अर्थसंकल्प फडणवीसच सादर करतील, हे जवळपास निश्चित मानलं जात आहे.

# रांगड्या राष्ट्रवादीचा अध्यक्ष मराठमोळा पाटील असावा, पटेल नको, राज ठाकरेंची बेधडक पोस्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष कोण होणार? असी देखील चर्चा सुरु आहे. याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी



प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही, अशी पोस्ट करत राज ठाकरे यांनी नाव न घेता खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे. त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावंच लागेल असे राज ठाकरे म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही असे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केले आहे.

# पाच लाखांची रोकड लंपास केल्याप्रकरणी कर्नाटकातून एकाला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा : पाच लाख रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केल्याच्या प्रकरणात एका आरोपीला अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं २८ जानेवारीच्या मध्यरात्री कर्नाटकातील शिवमोगा येथून आरोपीला ताब्यात घेतलं. ही घटना १६ सप्टेंबर २०२५ रोजी घडली होती.

पाच लाखाची रोकड केली लंपास – वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील बाळखेड येथील रहिवासी नितीन जिजेबा पऱ्हाड हे आपल्या मुलीच्या प्रवेशासाठी बुलढाण्यातील राजश्री शाहू कॉलेज परिसरात स्विफ्ट डिझायर कारनं आले होते. गाडीच्या मागील सीटवर प्रवेश आणि इतर व्यवस्थेसाठी आणलेली पाच लाख रुपयांची रोकड ठेवलेली पिशवी होती. प्रवेश प्रक्रियेसाठी विलंब झाल्याने ते कॉलेजमध्ये विचारपूस करण्यासाठी गेले. परत आल्यानंतर गाडीच्या मागील काचा फुटलेल्या दिसल्या आणि पिशवी गायब झाल्याचं लक्षात आलं.

आरोपीला कर्नाटकातून केली अटक – परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन अज्ञात दुचाकीस्वार पैसे चोरताना दिसले.

याप्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदर माहितीच्या आधारे आरोपी सुनील उर्फ बालू रामू भोवी (वय– ३२) यास कर्नाटकातील शिवमोगा येथून अटक केली. त्याच्या ताब्यातील पाच लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. दुसरा आरोपी विष्णू सध्या फरार आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

पोलिसांची मोठी कारवाई – ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वात पार पडली. पथकात पोलीस उपनिरीक्षक अविनाश जायभाये, हेड कॉन्स्टेबल दीपक लेकुरवाळे, चाँद शेख, गणेश पाटील, गजानन गोरले, राजू आडवे, पवन मखमले, ऋषि खंडेराव यांचा समावेश होता.

# मुंबईतील एक्युआय सुधारण्याकरता सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समितीची रचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एमएमआरमधील प्रदूषण नियंत्रणात आणण्यात अपयशी ठरलेल्या मुंबई महानगरपालिका (बीएमसी) प्रशासनाच्या कारभारावर मुंबई उच्च न्यायालयानं पुन्हा एकदा तीव्र नाराजी व्यक्त केलीय. मुंबईतील वाढतं वायू प्रदूषण नियंत्रणात आणण्याकरता उपाययोजनांवर देखरेख ठेवत शिफारशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयानं घेतलाय. मुंबईतील खराब एक्यूआय आणि वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयानं साल २०२२ मध्ये दाखल केलेल्या सुमोटो जनहित याचिकेवर गुरुवारी (२९ जानेवारी) मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. यावेळी महानगरात वाढलेलं प्रदूषण अद्याप कमी झालेलं नसून यात पालिका प्रशासनांची उदासिनता दिसून येत असल्याचं निरिक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

मुंबई महानगरपालिका काम करतेय, पण दिसत नाही : गुरुवारच्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयानं पुन्हा एकदा मुंबई महानगरपालिका प्रशासनांच्या निष्क्रीयतेवर ताशेरे ओढले. तसंच मुंबई आणि नवी मुंबईतील वायू प्रदूषण कमी करण्यासंदर्भातील नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत पालिकांना बजावलं. यापूर्वी दिलेल्या निर्देशांचं पालन होतं आहे की नाही?, यावर देखरेख ठेवण्यासाठी आणि शिफारसी करण्यासाठी आता सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखाली उच्चाधिकार समिती स्थापन करत असल्याचं मुंबई उच्च न्यायालयानं नमूद केलंय. या समितीत आणखीन कोण असेल?, समितीची कार्यकक्षा काय असेल?, तिची रूपरेषा याबाबत लवकरच सविस्तर आदेश जारी केले जातील, असं मुंबई उच्च न्यायालयानं गुरूवारी स्पष्ट केलंय. तसंच मुंबईतील प्रदूषणाची पातळी गेल्या काही दिवसांत कमी झालेली नाही. डिसेंबरमध्ये तर ती खूप गंभीर होती. न्यायालयीन कामकाजाचा वाढता ताण असल्यामुळं आम्ही विविध पालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानं दाखल केलेली सर्व प्रतिज्ञापत्रे आणि तज्ज्ञ समितीनं सादर केलेला अहवाल प्रत्येकवेळी तपासू शकत नाही. त्यामुळं याबाबात आता उच्चाधिकार समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. ही समिती यावर नियमित बैठका घेईल, समितीला विविध प्राधिकरणांकडून मदत पुरवली जाईल, असं मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केलेय.

मुंबईची हवा सध्या खराबच : एक्यूआयच्या बाबत दाखल सुमोटो याचिकेवर गुरूवारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाला मदत करण्यासाठी नेमणूक केलेल्या न्यायालयीन मित्र (अमाईकस क्युरी) दरायस खंबाटा यांनी न्यायालयाला माहिती दिली की, जानेवारीच्या पहिल्या २५ दिवसांतील १८ दिवस मुंबईची हवा ही 'खराब' श्रेणीतच होती. त्यामुळं पालिकेवर कुणाचा तरी सतत अंकुश असणं आवश्यक आहे. एमएमआर क्षेत्रात खालावत चाललेल्या हवेच्या गुणवत्तेबाबत काम करण्यासाठी एक विशेष समिती स्थापन करणार असल्याचं मुंबई उच्च न्यायालयाने गुरूवारी जाहीर केलंय. ही समिती मुंबईसह आसपासच्या परिसरात खालावत चाललेल्या हवेच्या गुणवत्तेबाबत काम करेल, योग्य त्या उपाययोजना करेल, असेही स्पष्ट केलेय.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक कामकाजाचा उपजिल्हाधिकारी देशमुख यांच्याकडून आढावा

## सुधारित निवडणूक कार्यक्रमाच्या ७ फेब्रुवारी रोजी मतदान तर ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी महसूल तथा ग्राम पंचायत निवडणूक प्रमुख संतोषकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक(दूरदृश्य प्रणाली द्वारे) पार पडली. या बैठकीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान श्री. देशमुख यांनी निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी स्पष्ट करून त्याचे महत्व अधोरेखित केले. निवडणूक पारदर्शक, सुरळीत व कायदेशीर चौकटीत पार पडावी यासाठी प्रत्येकाने आपापल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात, असे त्यांनी सांगितले.

श्री. देशमुख यांनी नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. मतदान केंद्र व्यवस्थापन, साहित्य वितरण, प्रशिक्षण, सुरक्षा व्यवस्था, तसेच मतदार जागृती यासंबंधीच्या जबाबदाऱ्या त्यांनी तपासून पाहिल्या. प्रत्येक नोडल अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात वेळेत व नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करावे, अशी सूचना त्यांनी दिली.

सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रत्येक मतदार केंद्रावर करण्यात आलेल्या सुविधाची पाहणी करावी, मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना बैठकीत देण्यात आली. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे मतदान केंद्राचे वेबकास्टिंग करण्यात यावे. तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांना आयोगाच्या निर्देशानुसार प्रशिक्षण देणे, साहित्य व मनुष्यबळ मतदानाच्या दिवशी वेळेवर पोहोचेल यासाठी योग्य नियोजन करणे यावर भर देण्यात आला.

सुधारित निवडणूक कार्यक्रम

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ गट व पंचायत समितीच्या १३६ गणासाठी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता ते सायंकाळी ५.३० वाजता या कालावधीत मतदान होईल तर ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजले पासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

मीडिया पासेस

मतदानाच्या दिवशी तसेच मतमोजणीच्या दिवशी स्थानिक स्तरावरील प्रिंट मीडिया तसेच इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतिनिधींना पास देण्याची व्यवस्था सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावरून राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत. जिल्हास्तरावरील इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतिनिधींसाठी पास देण्याबाबत जिल्हा स्तरावरून स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही सूचित करण्यात आले आहे.

लोकशाही प्रक्रियेचे महत्व अधोरेखित

श्री. देशमुख यांनी सर्व अधिकाऱ्यांना निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया असल्याचे सांगून जबाबदारीने व पारदर्शकतेने काम करण्याचे आवाहन केले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर तात्काळ निवडणूक शाखेची संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

---

## बोपगांव येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिर उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : सिहंगड कॉलेज ऑफ सायन्स आंबेगाव (बु.) येथील राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) विभागाच्या वतीने २१ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत बोपगांव, ता. पुरंदर, जि. पुणे येथे विशेष हिवाळी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हे शिबीर राष्ट्रीय

सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहकायनि राबविण्यात आले.उदघाटन कार्यक्रम बोपगावच्या सरपंच सौ सारिका गुरव यांच्या उपस्तितीत पार पडला त्यावेळी सिहंगड कॉलेज चे प्राचार्य डॉ मगन घाटू ळे, उपसरपंच श्रीमती सुवर्णा जगदाळे, बोपागावाचे पोलीस पाटील श्री. विनायक गायकवाड, ग्रामसेविका सौ. राखी ढगारे, ग्राम महसूल अधिकारी कल्पेश कटारे व कॉलेज चे प्राध्यापक वर्ग राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी प्रा. हिरामण कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामस्वच्छता अभियान,पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व पडीक जमिनीचा विकास, प्लास्टिक निर्मूलन, लोकशाहीतील सहभाग आणि मतदार जनजागृती,या विषयावर आधारित या सात दिवसीय शिबिरात विध्यार्थी व विदयार्थीनी ( स्वयंसेवकांनी ) उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिरादरम्यान स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण,

प्लास्टिक संकलन, जलसाक्षरता, आरोग्य तपासणी, औषधांविषयी जनजागृती, विविध सर्वेक्षणे, पथनाट्य व ग्रामजागृती उपक्रम राबविण्यात आले.

शिबिराच्या पहिल्या दिवशी गाव परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पहिल्या दिवशी बजाज पुणे ग्रँड टूर सायकल मॅरेथॉन २०२६मध्ये सहभाग

प्लास्टिक संकलन मोहीम राबविण्यात आली. औषधांचे दुष्परिणाम, योग्य औषधवापर व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन याविषयी सर्वेक्षण प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. सहाव्या

दिवशी आनंद नगर बोपगांव येथील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले तसेच ग्रामस्थ व स्वयंसेवकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शेवटच्या दिवशी डॉ. मगन घाटू ळे प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली शिबिराचा समारोप सोहळा पार पडला. यावेळी स्वयंसेवकांनी आपले अनुभव व्यक्त केले.

---

## वागदरी ग्रामस्थांच्या वतीने दिवंगत अजित दादा पवार यांना श्रद्धांजली





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री राजकीय चळवळीतील एक धाडसी आणि रांगडं नेतृत्व दिवंगत अजित दादा पवार यांच्या अकाली दुःखद निधनाबद्दल वागदरी तालुका तुळजापूर येथे महायुतीसह गावातील समस्त ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री राजकीय चळवळीतील एक अनुभवी आणि धाडसी नेतृत्व सर्वसामान्य जनतेला सर्व जाती धर्मातील लोकांना समान न्यायिक भावनेतून न्याय देणारे राजकारणातील आदरयुक्त दादा नामदार अजित दादा पवार यांचे दिनांक २८ जानेवारी २२६ रोजी विमान अपघातामध्ये दुःखद निधन झाले.त्यांच्या या अनपेक्षित दुःखद निधनाबद्दल वागदरी येथील सर्वपक्षीय तमाम ग्रामस्थांच्या वतीने गावातील मुख्य चौकात श्रद्धांजली सभेचे आयोजन करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड राष्ट्रवादी काँग्रेस चे युवा नेते अमोल पाटील, भाजपाचे सोशल मीडिया प्रमुख किशोर धुमाळ प्राध्यापक गणेश बिराजदार आदीनी शब्दसुमनाने समस्त ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहिली.यानंतर उपस्थित सर्वांनी आपापल्या जागेवर दोन मिनिट शांत उभे राहून आपल्या लाडक्या नेतृत्वाला श्रद्धांजली वाहिली.या प्रसंगी ज्ञानेश्वर पाटील, किशोर धुमाळ, मदन पाटील, दत्ता सुरवसे, ज्ञानोबा सुखसे, आपा मिटकर नामदेव यादव पंकज सुरवसे रामसिंग चव्हाण भालचंद्र यादव, दत्तात्रय पाटील,चरणसिंग परिहार मोहनसिंग दादा चव्हाण सह गावातील सर्वपक्षिय कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## कळंब येथे कामगार कल्याण केंद्रात प्रजासत्ताक दिन उत्साह साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय लातूर अंतर्गत कामगार कल्याण केंद्रात भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळी. ७:५५ वाजता भैरवनाथ शुगर इंदापूर साखर कारखान्याचे मुख्य लेखापाल रामचंद्र कारंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भैरवनाथ शुगर इंदापूरचे मुख्यलेखापाल रामचंद्र कारंडे, पत्रकार माधवसिंग राजपूत, दिनेश बर्वे, जितेंद्र कोथळकर, गणेश भराडे, साखरे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी माधवसिंग राजपूत यांनी भारतीय लोकशाही या विषयावर आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते शिशु मंदिर बालकांना खाऊ वाटप करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केंद्रप्रमुख उमेश जगदाळे, दिनेश गिरी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिज्ञा वरखेडकर यांनी व आभार अनुजा कुलकर्णी यांनी मानले.

---

## श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक उच्च प्राथमिक विद्यामंदिरमध्ये विद्यार्थी स्वयंपाक महोत्सव






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री रुक्मिणी विद्यापीठ संचलित श्री माताजी निर्मला देवी प्राथमिक उच्च प्राथमिक विद्यामंदिर मध्ये संस्थापक सचिवा मा.सुनेत्राताई पवार सो यांच्या संकल्पनेतून आनंदी शनिवार उपक्रमांतर्गत जीवन कौशल्य शाळा घेण्यात आली.

प्रशालेतील चौथीच्या वर्गाने स्वयंपाकाचे साहित्य आणून स्वयंपाक तयार करण्याचा अनुभव घेतला. पाच गटात झालेले या उपक्रमात मुलांनी घरून पीठ, मीठ, मसाले, तांदूळ भाजीचे साहित्य आणले होते. मैदानावरच्या लाकूड फाटा गोळा करून चुली पेटवल्या.

दररोज आयता डबा घेऊन येताना आईला किती कष्ट करावे लागतात याचा अनुभव मुलांनी घेतला. काहींची कणीक पात्र झाली तर काहींच्या भाकऱ्या तव्यापर्यंत जाईपर्यंत एकाच्या दोन-तीन वेळा झाल्या. मध्येच चूल विझल्याने धूर झाला. चूल फुकताना धुराचा त्रास झाला. पण एकदाचा स्वयंपाक तयार झाला तो मात्र अप्रतिम.

गटाने तयार केलेले बाजारआमटी, बटाट्याची भाजी, वांग्याची भाजी व पातळ पिठलं आणि मसाले भात सर्व काही पंक्तीत चांगला भाव खाऊन गेली. भाकरी आकाराने नव्हे पण चवीला छान झाल्या होत्या. दोन-तीन प्रकारचे भात करायला वेळ लागला पण थोड्याच वेळात फस्त झाला.

मुख्याध्यापक श्री संतोष कवडे व वर्ग शिक्षक महेश भोसले यांनी सर्व गटांना स्वयंपाकाच्या सूचना केल्या. त्याचबरोबर अश्विनी गुमटे मॅडम, सुवर्णा जगदाळे मॅडम, राणी लाडे मॅडम व जिजाबाई सोनटक्के काकू यांनी मुलांना स्वयंपाक करण्यासाठी खूप मदत केली.

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे मुलांना स्वयंपाकासारख्या महत्त्वाच्या जीवन कौशल्याचे ज्ञान व्हावे. त्यातील कष्ट समजावेत व मुलांनी आई-वडिलांना घरी ही मदत करावी. लिंग समानतेचा धडा मिळावा.

एकदा स्वयंपाक तयार झाल्यावर मात्र सर्व शिक्षक विद्यार्थी यांची अंगत पंगत बसून सगळ्या स्वयंपाकावर ताव मारला आणि मुले एका महत्त्वाच्या जीवन कौशल्याचा अनुभव घेऊन आनंदाने घरी गेली.

---

## दतवाड जिल्हा परिषद मतदार संघात अटीतटीचा सामना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : दत्तवाड तालुका शिरोळ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जवळ आल्या असल्यामुळे अनेक उमेदवारांनी आपली ताकद दाखवण्यास सुरुवात केली आहे.

हा सामना फार अटीतटीचा असणार आहे. आपापल्या पक्षाने उमेदवार आपला निवडून आणण्यासाठी कस बांधली आहे.

आतापर्यंत बघितलं तर जिल्हा परिषद उमेदवार हे दतवाड मधूनच निवडून आलेले आहेत.

जनता ही आता उमेदवाराकडे बघणार की पक्षाकडे बघणार असा प्रश्न आता पुढे येत आहे.

---

## हुतात्मा स्मृति मंदिरात नामवंत कलाकारांची पर्वणी | देवकी पंडित, मंजिरी कर्वे-आलेगावकर यांना ऐकण्याची संधी

# सोलापुरात ७ व ८ फेब्रुवारीला प्रिसिजन संगीत महोत्सवाचे आयोजन

**निखिल पटवर्धन यांचे सतार, एस. आकाश बासरी, यज्ञेश रायकर यांच्या व्हायोलिन वादनाचे गुंजणार स्वर**


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रिसिजन फाऊंडेशनच्या वतीने येत्या शनिवार व रविवार, दि. ७ आणि ८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रिसिजन संगीत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.प्रिसिजनच्या परंपरेनुसार दोन्ही दिवस कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ठीक ६.२५ वाजता होणार आहे. महोत्सवाचे हे अकरावे वर्ष आहे. सोलापूरमधील हुतात्मा स्मृति मंदिर येथे हा स्वरमहोत्सव रंगणार असल्याची माहिती प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.


महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी दोन सत्रांत कार्यक्रम होणार आहेत.पहिल्या सत्रात प्रख्यात सतारवादक निखिल पटवर्धन यांचे सतारवादन होईल. त्यांना पांडुरंग पवार तबल्यावर साथ करतील. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध गायिका मंजिरी कर्वे-आलेगावकर यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यांना सौरव दांडेकर (हार्मोनियम) आणि अजित किंबहुने (तबला) तर प्राची जोगळेकर (तानपुरा) साथसंगत करतील.

रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरीवादक एस. आकाश यांचे बासरीवादन होईल. त्यांना ईशान घोष तबल्यावर साथ देतील. याच सत्रात यज्ञेश रायकर यांचे व्हायोलिनवादन सादर होणार आहे. महोत्सवाच्या अंतिम सत्रात सुप्रसिद्ध गायिका देवकी पंडित आपली स्वर-साधना रसिकांसमोर मांडतील. त्यांना प्रशांत पांडव (तबला) आणि अभिषेक शिनकर (हार्मोनियम) वर साथसंगत करतील.


शास्त्रीय संगीत आणि कलांचा प्रचार-प्रसार, नव्या श्रोत्यांमध्ये संगीताची गोडी निर्माण करणे आणि मोठ्या प्रमाणावर रसिकांपर्यंत कला पोहोचवणे या उद्देशाने प्रिसिजन संगीत महोत्सव सुरू करण्यात आला. मागील १० वर्षांत हा महोत्सव सोलापूर शहराची




देवकी पंडित
(गायन)




मंजिरी कर्वे - आलेगांवकर
(गायन)



निखिल पटवर्धन
(सितार)



एस आकाश
(बासरी)



यज्ञेश रायकर
(व्हायोलिन)

सांस्कृतिक ओळख बनला आहे.

सोलापूरकर रसिकांना या महोत्सवाचा आनंद निःशुल्क घेता येणार आहे. निःशुल्क प्रवेशिका (फ्री पासेस) मंगळवार दि. ३ फेब्रुवारीपासून हुतात्मा स्मृती मंदिरात सकाळी ९ ते १२ आणि संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत उपलब्ध असतील. प्रवेशिकांसाठी सिकंदर शेख (मोबाईल :९८२२८९७९६२) यांच्याशी संपर्क साधावा. रसिकांनी आपले नाव नोंदवून प्रवेशिका घ्याव्यात. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर आसन व्यवस्था राहणार आहे.

रसिकांनी वेळेपूर्वी उपस्थित राहून जागतिक दर्जाच्या कलाकारांच्या स्वराविष्काराचा आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सुहासिनी शहा, प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडचे चेअरमन यतिन शहा आणि कार्यकारी संचालक करण शहा यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस माधव देशपांडे, नितीन फलटणकर आदी उपस्थित होते.

# विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे आजी-माजी चेअरमन आम्ही एक झालो

## आ. अभिजित पाटील, भगीरथ भालके यांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या कार्यालयात केली घोषणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नुकत्याच पार पडलेल्या पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत मनसेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी विठ्ठल परिवार एकत्रित घेऊन तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून या निवडणुकीत सत्तांतर घडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले होते. त्याला यश मिळाले होते त्यानंतर त्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आणि निवडणुकीचे विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील आणि माझी चेअरमन भगीरथ दादा भालके यांची युती करण्यात पुन्हा एकदा मनसे नेते दिलीप धोत्रे यांना यश मिळाले आहे.

मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या संपर्क कार्यालयात तीर्थक्षेत्र विकास आघाडी नेते भगीरथ भालके आणि विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन आमदार अभिजीत पाटील यांनी एकत्रितपणे येऊन आम्ही आता या निवडणुकीसाठी ही एकत्रीत आलो असल्याची घोषणा केली आहे.

सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये विठ्ठल परिवाराची दुपारी निर्माण झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले होते यामध्ये सहकार शिरोमणीची चेअरमन कल्याण काळे, युवराज पाटील, गणेश पाटील यांनी भाजपबरोबर प्रचार सुरु करीत आपल्या कुटुंबातील व्यक्तींना भाजपच्या कमळ चिन्हावर उमेदवारी दिली आहे. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील यांनी स्वतंत्र विचाराची उमेदवार उभे केले दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी आपले उमेदवार उभे केले आहेत. तर विठ्ठल चे माजी चेअरमन बगीरथ भालके यांनी आपल्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे उमेदवार उभे केले आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत उतरले आहेत. प्रत्येक उमेदवारांनी तयारी आपल्या पद्धतीने सुरू केली होती. आज शनिवार आमदार अभिजीत पाटील आणि बगीरथ दादा भालके यांनी आम्ही दोघे एक झालो असल्याची जाहीर केले आहे त्यामुळे दोघांच्या संमतीचे उमेदवार नेमके कोण? हे मात्र काही वेळेने सांगणार असल्याची त्यांनी त्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आहे.

आम्ही जिल्हा परिषद गटाच्या उमेदवारीवरून भालके आणि पाटील यांच्यातील युती किचकटले असलेली जाहीर होते मात्र त्या ठिकाणी असलेले जागा अभिजीत पाटील या गटाला देऊन बघायला उमेदवारी देत भाजपचे उमेदवार मोनिका समाधान काळे यांना एकास एक लढत देण्याचा मार्ग काढला असल्याची दिसून येत आहे. तशाच प्रकारे काही गट पंचायत समिती गणातील कोणता गट कोणाच्या वाटेला जाणार आहे रात्री उशिरापर्यंत सांगण्यात येणार आहे.

मनसे येथील कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेच्या वेळी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे पंढरपूरचे नगरसेवक नागेश काका भोसले, यांच्यासह आमदार अभिजीत पाटील, भगीरथ भालके यांची कार्यकर्तेही उपस्थित होते.

# कळंब येथे सुरेश टेकाळे यांचा साने गुरुजी राष्ट्रीय शिक्षक रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मौजे पिंपळगाव (डोळा) येथील रहिवाशी व भाटशिरपुरा येथील कै. भाई नारायणराव लोमटे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुरेश टेकाळे यांचा मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, मुंबई यांच्या वतीने दोन दिवसीय ५८ वे राष्ट्रीय अधिवेशन बेळगाव (कर्नाटक) येथे आयोजित करण्यात आले होते.

या अधिवेशनामध्ये अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षकांचा, मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या राष्ट्रीय अधिवेशनात कळंब तालुक्यातील कै. भाई नारायणराव लोमटे विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री.सुरेश टेकाळे यांचा स्वातंत्र्य सेनानी प्रकाश भाई मोहाडीकर स्मृती साने गुरुजी राष्ट्रीय शिक्षक रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाल्याबद्दल कळंब येथील मित्र परिवाराच्या वतीने मुख्याध्यापक श्री. सुरेश टेकाळे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या सत्कार प्रसंगी अच्युत उर्फ बाबू पौळ, शरद खंदारे, विक्रम गायकवाड,अशोक माळी, सखावत पठाण, प्रदीप मुंडे, पत्रकार माधवसिंग राजपूत, सुधाकर चौरे, शेषेराव करवलकर, शाम पाटील, प्रमोद पोते,प्रशांत जोशी, सतीश लाखे, बाळासाहेब सावंत, रमेश लोकरे , राम हारकर यांच्या सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारंपारिक पानसुपारीच्या कार्यक्रमाने अमोल पाटील यांनी केला आपल्या प्रचाराचा शुभारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : वागदरी ता. तुळजापूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सक्रिय निष्ठावंत कार्यकर्ते अमोल राजकुमार पाटील हे नंदगाव जिल्हा परिषद गटातून तर येडोळा ता. तुळजापूर येथील माजी सरपंच पद्माकर पटील हे खुदावाडी पंचायत समिती गणातून सदस्यत्वाची निवडणूक लढवत असून आपल्या प्रचाराचा शुभारंभ त्यांनी वागदरी येथे पारंपारिक पानसुपारीच्या कार्यक्रमाने केला.

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गटातून एकूण चार उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत तर पंचायत समिती खुदावाडी गणातून एकूण आठ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून तुतारी वाजवणारा माणूस या निवडणूक चिन्हावर नंदगाव जिल्हा परिषद गटातून वागदरी येथील कार्यकर्ते अमोल पाटील हे निवडणूक लढवत आहेत तर खुदावाडी पंचायत समिती गणातून तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हावर येडोळा येथील माजी सरपंच पद्माकर पाटील हे निवडणूक लढवीत आहेत.त्यांनी कसल्याही प्रकारचा देखावा न करता आपल्या प्रचाराचा शुभारंभ वागदरी तालुका तुळजापूर येथे अमोल पाटील यांच्या घरी पान सुपारी चा कार्यक्रम घेऊन केला या पारंपारिक पद्धतीने पान सुपारीच्या कार्यक्रमाने आपल्या प्रचाराचा शुभारंभ करताना त्यांनी गावातील सर्व ग्रामस्थांना निमंत्रित केले होते.यावेळी बोलताना अमोल पाटील म्हणाले की ग्रामीण भागातील ज्या अनेक समस्या आहेत त्या समस्या शासकीय पातळीवरून सोडविण्यासाठी व सर्वसामान्य जनतेची सेवा करण्यासाठी अत्यंत निरपेक्ष भावनेतून आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरलो असून माझी निवडणूक ही केवळ आणि केवळ जनतेच्या सेवेसाठी आहे. तेंव्हा आपली सेवा करण्याची संधी मला द्यावी असे कळकळीची अवाहन त्यांनी यावेळी उपस्थिततांना केले. याप्रसंगी पद्माकर पाटील यांनीही आपले विचार व्यक्त केले. या प्रसंगी वागदरी व येडोळा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी पानसुपारी करून आपल्या प्रचाराच्या शुभारंभ केल्याचे सर्वांना समाधान वाटले.

# श्री विठ्ठल सभामंडप येथे औसेकर महाराजांचे चक्रीभजन संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री अशा चार प्रमुख यात्रा पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणावर भरतात. त्यापैकी माघी यात्रा सध्या संपन्न होत असून, या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराशी निगडित असलेल्या प्राचीन परंपरांचे कटाक्षाने पालन करण्यात येत आहे.

माघ शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी श्री विठ्ठल सभामंडप येथे ह.भ.प. औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची पारंपरिक परंपरा आहे. त्यानुसार शुक्रवार, दि. ३१ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत श्री विठ्ठल सभामंडप येथे चक्रीभजन भक्तिभावाने संपन्न झाले.

सदर चक्रीभजन सद्गुरू गुरुबाबा महाराज औसेकर यांनी सादर केले. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, व्यवस्थापक संदेश भोसले, विभाग प्रमुख संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, राजेश पिटले, अतुल बक्षी, राजेंद्र घागरे, राजाराम ढगे, सावता हजारे, शंकर मदने श्र तसेच सुमारे एक हजार ते दीड हजार भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शके १७१८ पासून चक्रीभजनाची परंपरा देगुलर येथील गुरुगुंडा महाराजांकडून संस्थानचे मूळ पुरुष सद्गुरू विरनाथ महाराज यांना प्राप्त झाली आहे. चक्रीभजन म्हणजे संसाराच्या चक्रातून व भयातून मुक्त करणारे भजन असून, या भजनामध्ये काही भाविक बसून तर काही उभे राहून नृत्यात्मक पद्धतीने भजन करतात. या भजनातून देहाची विदेही अवस्था प्राप्त होत असल्याची अनुभूती मिळते.

औसेकर घराण्याकडून सन १७९२ पासून माघ वारी काळात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या सेवार्थ चक्रीभजनाची अखंड परंपरा जोपासली जात आहे. चक्रीभजनामध्ये एकूण १४ भजने सादर केली जातात. या भजनातून वारकरी संप्रदाय पूर्णतः भक्तिरसात रंगून जातो, असे औसा संस्थानचे अध्यक्ष तसेच मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. दरम्यान, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मंदिरात होणारे विविध मोठे धार्मिक सोहळे व कार्यक्रम समाज माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपित करण्यात येत आहेत. त्यानुसार सदर चक्रीभजन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच युट्युब व फेसबुक या समाज माध्यमांवर करण्यात आले. यामुळे हजारो भाविकांनी घरबसल्या या भक्तीमय सोहळ्याचा आनंद घेतला.

**मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात सन १९७१ पासून सर्व माजी विद्यार्थ्यां आठवणीचा मेळावा उत्साहात संपन्न**

# माजी विद्यार्थी हा मविप्र चा खरा कणा : सभापती क्षीरसागर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य स्वीकारत कर्मवीरांनी मवीप्र समाजाची स्थापना केली. नर्सरी ते पदव्युत्तर सर्वच अभ्यासक्रमीय शाखांबरोबर व्यावसायिक शिक्षण सोयीसुविधा निर्माण केल्या. माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य, त्यांचा दानशूरपणा, मार्गदर्शन आणि पाठिंबा ही गोष्ट संस्थेसाठी खूपच महत्त्वाची असून, माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून अनेक भरीव व विकासात्मक कामे उभी राहिली आहेत, त्यामुळेच ज्येष्ठ, जुने जाणते सर्व माजी विद्यार्थी हे मविप्रचा खरा कणा असल्याचा विश्वास मविप्र सभापती बाळासाहेबजी क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

निफाड महाविद्यालयात सन १९७१ पासूनच्या सर्व माजी विद्यार्थी आठवणींचा मेळाव्याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतात बाळासाहेब क्षीरसागर बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष विश्वासजी मोरे, उपसभापती देवरामजी मोगल, संचालक शिवाजी गडाख, संचालिका शोभाताई बोरस्ते, भागवत बाबा बोरस्ते, डॉ. उत्तम डेरले, शिक्षणाधिकारी शशिकांत मोगल, के. एस. शिंदे, राजाभाऊ शेलार, अनिल कुंदे, शिवाजी ढेपले, वैकुंठ पाटील, दीपक श्रीवास्तव, एड. प्रवीण ठाकरे, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. कल्पना अहिरे, प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, प्राचार्य डॉ. ए. के. शिंदे व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मेळाव्यासाठी अन्नदान करणारे नंदलाल चोरडिया, राजाभाऊ राठी, अमित पडोळे, नंदकिशोर कापसे, विक्रम रंधवे, संदीप जेउघाले, देवदत्त कापसे, आणि ५१ हजार देणगी विजय कडलग व २१ हजार देणगी प्राचार्य डॉ. सुरेश जाधव या सर्वांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

उपाध्यक्ष विश्वासजी मोरे यांनी १९७१ पासूनचा एकत्रित विद्यार्थी मेळावा घेतल्याबद्दल या संकल्पनेचे कौतुक करत, मेळाव्याला प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या निफाड महाविद्यालयावर प्रेम करणाऱ्या सर्व माजी विद्यार्थ्यांना धन्यवाद देत, महाविद्यालयाशी व मविप्र संस्थेशी असलेली नाळ अशीच जोडलेली ठेवा असे भावनिक आवाहन केले.

उपसभापती देवरामजी मोगल यांनी सांगितले की, आज विविध क्षेत्रात उच्चपदस्थ व यशस्वी वाटचाल करणारे तसेच कृषी आणि सर्वच विभागात भरीव काम करणारे माजी विद्यार्थी यांच्या जडणघडणीत निफाड महाविद्यालयाचा मोलाचा वाटा आहे असे म्हटले.

माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी महाविद्यालयाने या मेळाव्यासाठी केलेले प्रयत्न व घेतलेली मेहनत याबद्दल गौरव उद्गार काढत.

या माजी विद्यार्थी मेळाव्या प्रसंगी जवळपास ५५ वर्षांमधील अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपले छान छान अनुभव, गमती जमती, प्रेरणादायी प्रसंग खुमासदार शैलीत मनोगते मांडली.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने माजी विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी आयोजित केली.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मविप्र समाज गीत गायन झाले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार, यांना सर्व उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी महाविद्यालयात राबवले जाणारे विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली व माजी विद्यार्थी मेळाव्या आयोजनाचे स्वरूप आणि हेतू विशद केले.

कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी मानले.

या मेळाव्याच्या यशस्वीततेसाठी मविप्र समाज संस्थेचे सर्व मविप्र कार्यकारिणी, सर्व शिक्षणाधिकारी या सर्वांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच माजी विद्यार्थी संघ, महाविद्यालय विकास समिती सर्व सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक प्राध्यापिका व सेवक वृंद आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

या मेळाव्यासाठी बहुसंख माजी विद्यार्थी माजी प्राध्यापक माजी प्राचार्य उपस्थित होते.

**माजी विद्यार्थ्यांसाठी आठवणींचा पिटारा, काही खास किस्से, गमतीशीर मनोगते, गप्पागोष्टी गाणे, सांस्कृतिक कार्यक्रम, मैदानी खेळांमध्ये गोट्यांची गलबत, वीट्टू दांडू, रस्सीखेच, संगीत खुर्ची, हॉलीबॉल, चेंडू ने ग्लास पाडणे आणि लगोरी, तसेच विविध ठिकाणी आपल्या आठवणी साठवून ठेवण्यासाठी सेल्फी पॉईंटची व्यवस्था, सर्वांनी एकत्र बसून भोजनाचा आस्वाद या सर्व व्यवस्था केलेल्या होत्या.**